# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १९/११/२०२३ (रविवार)

---

## ॲल्युमिनीअम तार चोरी

**पोलीस स्टेशन खापा**:– अंतर्गत मौजा वाकोडी शिवार सालई रोड, यातील फिर्यादी यांचे महावितरण कंपनीचे खापा ग्रामीण येथे विज वितरण केंन्द्र अंतर्गत येणा–या वाकोडी फाटा ते वाकोडी शिवार येथेदि. १७.११.२३ चे २.०० ते ०३.०० वा दरम्यान महावितरणाच्या १)लघुदाब वाहीनीचे अल्युमिनीयम तार अंदाजे २३० मी. किमती ३२,०००/–रू २) लघुदाब वाहीनीचे अल्युमिनीयम तार अंदाजे २७० मी. किमती ३८,०००/रू असा एकुण ७०,०००/–रू चा माल कोणतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–श्री शाहरूख मेहमूदीन तुरक वय ३१ वर्ष रा. खापायांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९ भादवी, अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री लोंढे साह पो स्टे खापा, मो क्र ९७६७५५१००० हे करीत आहे.

## घरफोडी

**पोलीस स्टेशन उमरेड**:–अंतर्गत उमरेड ०.५ किमी दक्षिण, यातील फिर्यादीचे बालाजी ट्रेडर्स किराणा दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन, दुकाणाचे आत प्रवेश करुन कॉउंटर मधिल नगदी ३०००/– रु. व सिगारेट पॉकीट प्रत्येकी १५०/– रु प्रमाणे ९००/– रु. चा माल तसेच पिल्लेवान कॉम्प्लेक्स मधिल दोन दुकाणाचे लोखंटी शटर अर्धवट उघडुन तेथे चोरी करण्याचा प्रयत्न केला, तसेच ईतवारीपेठ मेन रोड उमरेड येथील ईलेक्ट्रीक शॉप येथील दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन चोरीचा प्रयत्न केला. सदरील घटना दिनांक १८/११/२३ चे ०२/०० ते ०३/३० वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोरांनी फिर्यादीचे दुकाणाचे लोखंडी शटर अर्धवट उघडुन दुकाणाचे आत प्रवेश करुन कॉउंटर मधिल नगदी ३०००/ रु. तसेच ईतर दुकाणातुन नगदी ७०००/– रु व सिगारेट व बियरकॅण किंमत २४००/– रु असा एकूण १२४००/ –रू चा मुद्देमाल चोरी केला आहे. काही दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केला असून दुकानाचे शटर वाकवून शटरचेसुद्धा नुकसान केला

सदर प्रकरण फिर्यादी नामे श्रीराम विठोबाजी वाघमारे वय ६० वर्ष रा. रेल्वे स्टेशन रोड विनय टाकीज जवळ मंगळवारी पेठ उमरेड हमु नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेडयेथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम३८०, ४५७, ४२७, ५११ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपासपोउपनि खोटेले सा. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत लोणारा शिवार शेत १० किमी पश्चिम.यातील फिर्यादी यांची मौजा लोणारा शिवारात शेती असुन ते शेतातच राहतात. त्यांचे शेतात कामाकरिता त्यांनी मागील ०८ महीन्यापुर्वीपासुन आरोपी १. सोनु २. सोनुची पत्नी गिता, दोन्ही रा.छींदवाडा ,मध्यप्रदेश यांना कामावर ठेवले होते.

दिनांक १७/११/२०२३ रोजी रात्री फिर्यादी व त्यांची साळी (मेहुणी) व मुलगा वय १२ वर्शे रा. लोणारा शिवार शेत हे तीघेही घरात झोपलेले होते. दिनांक १८/११/२०२३ चे सकाळी ०५/३० ते ०६/०० वा दरम्यान फिर्यादीच्या शेतात काम करणारे **आरोपी १. सोनु २. सोनुची पत्नी गिता,** यांनी फिर्यादीचा घराचा दरवाजा वाजविल्याने फिर्यादीने बाहेर येउन पाहीले असता, तेव्हा दोन्ही आरोपींनी मजुरीचे ०८ महीन्याचे पैसे मागुन फिर्यादी सोबत वादविवाद करणे सुरु केले. त्या दरम्यान दोन्ही आरोपींनी फिर्यादीच्या साळीचा (मेहुणी) चा **मुलगा वय १२ वर्षे यांच्या अल्पवयाचा फायदा घेउन त्याला फुस लावुन पळवुन नेले. तसेच दोन्ही आरोपींनी फिर्यादीच्या खताच्या चुमडीमध्ये ठेवलेले २५,०००/— रुपये व निळ्या रंगाची प्लॅटिना (बजाज) मोटार सायकल क्र. एम एच ४९ — बी एक्स ७३६७ व ०२ मोबाईल सोबत घेउन गेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी नामे १.सोनू २. सोनूची पत्नी गीता दोन्ही रा.छिंदवाडा यांचे विरोधात कलम ३६३ भादवि अन्वयें गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स पो नि दिलीप पोटभरे पो स्टे कळमेश्वर मो.९९२३००२६६४हे करीत आहे.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन कन्हान**:— अंतर्गत मौजा टेकाडी राहते घरी ०७ किमी उत्तर.यातील मृतक नामे— विकास किशोर नाईक वय २४ वर्ष रा टेकाडी ता पारशिवनी याने शेतीच्या कर्जाच्या टेंशन मुळे घरातील बाथरुमला लागुन ला असलेल्या टीनाच्या खोलीत दिनांक १७/११/२३ चे २३/३० वा ते १८/११/२३ चे ०३/०० वा दरम्यान गळफास लावुन आत्महत्या केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—आशिश नाईक वय ३२ वर्ष रा टेकाडी ता पारशिवनी मो क्र ९८३४२६१४५६ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौअन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर मर्गचा पुढील तपास सतीश फुटाने पोस्टे कन्हान मो न ९५१८३३४७२३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर:**—अंतर्गत मौजा रा. ब्राम्हणी वार्ड क्र २ कळमेश्वर.यातीलफिर्यादीचे साळभाउ मृतक नामे— सुनील धनराज जगनाडे वय ५४ वर्ष रा. ब्राम्हणी वार्ड क्र २ कळमेश्वर यांचे दिनांक १७/११/२३ चे रात्री २१/३० वा. छातीत दुखत असल्याने उपचाराकरीता ग्रामिन रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता, तेथील वैदयकीय अधिका—याने तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—संदीप विनायकराव जगनाडे वय ४४ वर्ष रा. ब्राम्हणी वार्ड क्र २ कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौअन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर मर्गचा पुढील तपास पो हवा/ मिश्रा ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**